# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक ८५-२२** **दिनांक - १६/०३/२०२२**

## नायजेरियन व्यक्तीचे ताब्यातून ३५,६९,०००/- रुपये किंमतीचा ३५६.९ ग्रॅम एम.डी. (मॅफेड्रॉन) जप्त करुन अटकेची कारवाई.

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे अंमलदार यांना दिनांक १५/०३/२०२२ रोजी गुप्त बातमीदारामार्फत खात्रिशीर बातमी मिळाली की, नालासोपारा पुर्व, मोरेगांव येथिल मोरेश्वर शाळेजवळ एक परकीय नायजेरियन व्यक्ती एम. डी. विक्री करण्यासाठी येणार आहे. सदरील मिळालेलया बातमीच्या आधारे वरिष्ठांच्या परवानगीने सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन मोरेश्वर शाळेजवळील परिसरात सापळा रचुन कारवाई केली असता नायजेरियन इसम नामे ईबे ईवे ऊर्फ चिमा मोजेस वय ३१, रा. मंगलमुर्ती बिल्डींग जवळ, नालासोपारा (पुर्व), मुळ रा. लागोस, देश नायजेरिया याचे कब्जात ३५६.९ ग्रॅम वजनाचा ३५,६९,०००/- रुपये किंमतीचा मॅफेड्रॉन हा अमली पदार्थ विक्रीकरिता बाळगला असतांना मिळून आल्याने त्याचेकडून नमुद अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. संपुर्ण कारवाई दरम्यान सदर आरोपीकडून एकुण ३५,८०,०००/- रुपये किं. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून त्याचेविरुध्द तुळींज पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ІІ १७०/२०२२ एनडीपीएस ॲक्ट कलम ८ (क), २१ (क) व २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयात आरोपीतास अटक करण्यात आली असून त्यास दिनांक १९/३/२०२२ पावेतो मा. न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. सदर गुन्हयाचा पुढिल तपास तुळींज पोलीस ठाण्याचे अधिकारी करित आहे. सदरील आरोपी नामे ईबे ईवे ऊर्फ चिमा मोजेस याचेविरुध्द यापुर्वी १) विरार पोलीस ठाणे गु.र.नं. ІІ १३६/२०१९ एनडीपीएस ॲक्ट ८ (क), २, २९ प्रमाणे २) सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा मुंबई गु.र.नं. २६/२०२१ भादंवि ४१९, ४२०, ३४ सह माहिती तंत्रज्ञान अधि. कलम ६६ (क) (ड) प्रमाणे २ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उपआयुक्त (गुन्हे), श्री अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस निरीक्षक श्री. देवीदास हंडोरे, पोहवा. धनाजी इंगळे, पोना पवन पाटील, प्रदीप टक्के, अजय सपकाळ, सुभाष आव्हाड, पोशि. अजय यादव यांनी केली आहे.

---ooo---